ePaper

## ‘महायुती सरकारचा हा 3600 कोटींचा घोटाळा’: प्रणिती शिंदे



| वर्ष - 8 । अंक - 52 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | बुधवार, दिनांक 28 ऑगस्ट 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

### आतील पानांत

- दुलीप ट्रॉफी : ३ खेळाडू संघाबाहेर
- भारतीय क्रिकेटपटूंवर पैशांचा पाऊस
- रणबीर स्वतः माझ्या घरी आला
- पुतळा कोसळणं खूपच वेदनादायी!

## काँग्रेसला राज्यात अच्छे दिन, काय सांगतो सर्व्हे?

# अब की बार, कोणीच नाही शंभरीपार!

### 80 जागा जिंकून काँग्रेस राज्यात नंबर वन ठरेल; भाजप, पवार गटात चुरस

। मुंबई । महाईन्यूज

**लोकसभा निवडणुकीत कोणाच्याही ध्यानीमनी नसताना काँग्रेसनं राज्यात १३ जागा निवडून आणल्या. गेल्या लोकसभा निवडणुकीत केवळ १ जागा जिंकणाऱ्या काँग्रेसनं यंदाच्या निवडणुकीत सत्ताधारी भाजपचे तीन तेरा वाजवले. विदर्भ, मराठवाड्यात दमदार कामगिरी करुन काँग्रेसनं राज्यात जोरदार कमबॅक केलं. सांगलीत अपक्ष लढून विजयी झालेल्या विशाल पाटील यांनीही काँग्रेसला पाठिंबा दिला. त्यानंतर आता पक्षानं विधानसभेसाठी कंबर कसली आहे. काँग्रेसच्या अंतर्गत सर्व्हेमुळे पक्षात उत्साह संचारला आहे.**







काँग्रेसनं केलेल्या सर्वेक्षणात पक्ष विधानसभेलाही सर्वात जास्त जागा जिंकेल असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. विधानसभेला ८० जागा जिंकून काँग्रेस राज्यातील सर्वात मोठा पक्ष ठरेल असा कयास आहे. काँग्रेसच्या सर्व्हेनुसार, दुसऱ्या क्रमांकासाठी भाजप, शरद पवारांमध्ये चुरस असेल. तर त्यानंतरच्या क्रमांकासाठी उद्धवसेना आणि शिंदेसेनेत काँटे की टक्कर पाहायला मिळू शकते. अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसची कामगिरी लोकसभेप्रमाणेच विधानसभेलाही निराशाजनक होण्याची शक्यता आहे. द न्यू इंडियन एक्स्प्रेसनं याबद्दलचं वृत्त दिलं आहे.

विधानसभेच्या गेल्या दोन निवडणुकांमध्ये भाजपनं शंभरी ओलांडली. २०१४ मध्ये भाजपनं १२२ जागा जिंकल्या. तर २०१९ मध्ये १०५ जागांवर बाजी मारली. पण यंदा कोणत्याच पक्षाला शंभरीपार करता येणार नाही, असं काँग्रेसचा सर्व्हे सांगतो. त्यामुळे यंदाच्या विधानसभेला जबरदस्त संघर्ष पाहायला मिळण्याची शक्यता आहे. राज्यात विधानसभेच्या एकूण २८८ जागा आहे. सत्ता स्थापनेसाठी १४५ हा जादुई आकडा आहे.

लोकसभेपाठोपाठ विधानसभेतही भाजपला धक्का बसण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे भाजपनं केलेल्या अंतर्गत सर्वेक्षणातूनही हीच बाब समोर आलेली आहे. जुलैमध्ये भाजपनं एक सर्व्हे केला. त्याचा तपशील ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात समोर आला. त्यानुसार भाजपला विधानसभा निवडणुकीत केवळ ५५ ते ६५ जागा मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे यंदाची विधानसभा निवडणूक भाजपला जड जाऊ शकते.

### भाजपला नाकीनऊ आणले

गेल्या लोकसभा निवडणुकीत भाजपनं राज्यात २५ जागा लढवत २३ जागांवर यश मिळवलं. पण यंदा त्यांना २८ जागा लढवूनही केवळ ९ जागा जिंकता आल्या. काँग्रेसविरुद्धच्या थेट लढतींनी भाजपला नाकीनऊ आणले. विदर्भात पक्षाला केवळ २ जागा मिळाल्या. तर मराठवाड्यात पक्षाला भोपळाही फोडता आला नाही. पाच टर्मचे खासदार रावसाहेब दानवे, पंकजा मुंडे यांच्यासारख्या दिग्गजांना पराभव पाहावा लागला.

## ओल्ड मॅन इज अगेन इन वॉर... शरद पवारांचा कॉन्फिडन्स वाढलाय आणि चेहऱ्यावरील तेजही!



शरद पवार.. राकट, कणखर महाराष्ट्राचा कोपरा न कोपरा माहिती असलेला महाराष्ट्रातील आजमितीचा एकमेव नेता. कोणतेही संकट आले की, अजिबात डगमगून न जाता, शांत व निश्चलपणे त्याला सामोरे जात, त्यावर मात करीत बाजी पलटविण्यात शरद पवार माहीर आहेत. मात्र त्यापेक्षाही ते ज्या पद्धतीने २०१९ पासून सत्ताधाऱ्यांना शह देऊन सगळे संपले असे वाटत अशताना कमबॅक करीत आहेत. त्यावरून हा ‘तरणाबांड म्हातारा’ लोकसभेपाठोपाठ विधानसभेलाही महायुतीपुढे भलेमोठे आव्हान उभे करू शकतो, याची झलक सध्या पवारांच्या वागण्या-बोलण्यात दिसून येते आहे. त्यामुळे साहजिकच महायुतीच्या नेत्यांमध्ये धडकी भरली आहे.

मागील दोन आठवड्यांपूर्वी पुण्यात संपन्न झालेल्या भाजपच्या अधिवेशनात शीर्षस्थ नेते अप्रत्यक्ष शरद पवारांवर शरसंधान करीत बेंबीच्या देठापासून टीका करीत होते. महायुतीला सत्तेपासून रोखणारा वाटेतील खरा अडसर तर शरद पवार हेच आहेत, हे भाजपला चांगलेच माहिती आहे. मी काय म्हातारा झालोय का? असे शरद पवार काही महिन्यांपूर्वी पुन्हा एकदा म्हणाले होते. लोकसभेच्या निवडणुकीत संपूर्ण पक्ष फुटल्यानंतर एकाकी पडलेल्या शरद पवारांनी ज्या पद्धतीने जोरदार कमबॅक केले, त्यामुळे संपूर्ण देशात त्यांच्या लढवय्येपणाची पुन्हा जोरदार चर्चा झाली. त्यापेक्षाही महत्त्वाची बाब म्हणजे पुन्हा पक्षाला उभारी देण्याचे व पक्ष कार्यकर्त्यांत जीव ओतण्याचे काम शरद पवारांनी केल्यामुळे लोकसभा निवडणुकीनंतर आता कार्यकर्त्यांनी विधानसभेला आपली शस्त्रे परजली आहेत.

# विमानतळ नामकरणावरून नाराजी?

## विकास कामांच्या बॅनरवरून शिंदे, फडणवीसांचे फोटो गायब

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**विधानसभेच्या जागावाटपावरून महायुती आणि महाविकास आघाडीमध्ये मारामाऱ्या होतील, असे विधान मनसेचे प्रमुख राज ठाकरे यांनी काही दिवसांपूर्वी पत्रकार परिषदेत केले होते. त्याचा प्रत्यय गेल्या काही दिवसांपासून येत आहे. महायुतीत कागल आणि पुण्यातील इंदापूरच्या जागेवरून वाद पेटला आहे.**



तसेच पुण्यात अजित पवार गटाने भाजपा आणि शिवसेनेवर कुरघोडी करण्याचा प्रयत्न केला आहे. पुण्यात सोमवारी (दि. २६ ऑगस्ट) उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते ३०० कोटींच्या विकास कामांचे भूमिपूजन करण्यात आले. यावेळी विकास कामाच्या ठिकाणी लावलेल्या बॅनरवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेच फोटो गायब असल्याचे निदर्शनास आले. यावरून भाजपाचे नेते आणि वडगाव शेरीचे माजी आमदार जगदीश मुळीक यांनी आक्षेप घेतला आहे.जगदीश मुळीक म्हणाले की, महायुतीमध्ये फक्त भाजपा, शिवसेना आणि आरपीआय (अ) युती धर्म पाळणार आहे का? त्यामुळे महायुतीमधील पक्षांमध्ये धुसफूस असल्याचा अंदाज राजकीय वर्तुळात व्यक्त केला जात आहे. १८ ऑगस्ट रोजी अजित पवार गटाची जनसन्मान यात्रा जुन्नरमधील नारायणगाव येथे पोहोचली असताना भाजपा पदाधिकाऱ्यांकडून त्यांना काळे झेंडे दाखविण्यात आले. पर्यटन खात्याशी संबंधित बैठकीदरम्यान अजित पवार गटाचे नेते, जुन्नरचे आमदार अतुल बेनके यांनी बॅनरवर शिंदे आणि फडणवीस यांचा फोटो न लावल्यामुळे वाद उद्भवला होता.

बॅनरवर फोटो लावण्यावरून वाद पेटल्यानंतर अजित पवार यांनी सांगितले की, विकास कामांच्या उदघाटन कार्यक्रमात फक्त स्थानिक लोकप्रतिनिधी, संबंधित खात्याचे मंत्री आणि जे मान्यवर उदघाटन कार्यक्रमासाठी येणार आहेत, त्यांचेच फोटो बॅनरवर लावण्याचा नियम महायुतीमधील तीनही घटक पक्षांनी केला आहे. त्यामुळे या विषयाला अधिक महत्त्व देण्याची गरज नाही.अजित पवार यांच्या भूमिकेवर बोलताना माजी आमदार मुळीक म्हणाले की, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी ज्या प्रकल्पांचे भूमिपूजन केले. त्या प्रकल्पासाठी महायुतीच्या नेत्यांनीही प्रयत्न केले होते. "दरम्यान वडगाव शेरीचे विद्यमान आमदार सुनील टिंगरे हे विसरले आहेत की, राज्यात भाजपा, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष असे तीन पक्षांचे सरकार आहे. या सरकारनेच या प्रकल्पांना हिरवा कंदील दाखविला. तरीही टिंगरे यांनी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्या फोटोशिवाय बॅनर लावले आहेत", अशी टीका मुळीक यांनी केली. पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या नामकरणावरूही भाजपा आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये मतभेद असल्याचे समोर आले होते. केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी पुणे विमानतळाला संत तुकाराम महाराज यांचे नाव दिले जाईल, असे सांगितले. राज्याने पाठविलेल्या प्रस्तावानंतर केंद्र सरकार सदर निर्णय घेणार असल्याचे ते म्हणाले. यावरून उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, प्रत्येकाला आपले मत मांडण्याचा अधिकार आहे. छत्रपती संभाजी महाराज यांचे नाव विमानतळाला देण्याचा प्रस्तावही पाठविण्यात आला होता. मुंबई विमानतळाचे नाव छत्रपती शिवाजी महाराज आणि नागपूर विमानतळाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर असे नाव देण्यात आलेले आहे. आमच्यात वेगवेगळी मते असू शकतात. पण एकत्र बसून त्यावर तोडगा काढू.

### पवारांच्या कार्यक्रमावरून धुसफूस?

तसेच पुण्यात अजित पवार गटाने भाजपा आणि शिवसेनेवर कुरघोडी करण्याचा प्रयत्न केला आहे. पुण्यात सोमवारी (दि. २६ ऑगस्ट) उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते ३०० कोटींच्या विकास कामांचे भूमिपूजन करण्यात आले. यावेळी विकास कामाच्या ठिकाणी लावलेल्या बॅनरवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेच फोटो गायब असल्याचे निदर्शनास आले. यावरून भाजपाचे नेते आणि वडगाव शेरीचे माजी आमदार जगदीश मुळीक यांनी आक्षेप घेतला आहे.जगदीश मुळीक म्हणाले की, महायुतीमध्ये फक्त भाजपा, शिवसेना आणि आरपीआय (अ) युती धर्म पाळणार आहे का?

# खड्डे बुजविण्यासाठी पुन्हा विशेष मोहीम

## खबरदार... खड्डे न बुजविणाऱ्या मंडळांना आयुक्तांचा इशारा

। पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**गणेशोत्सवासाठी मांडव टाकताना काही गणेश मंडळांकडून रस्त्यावर घेतले जात आहेत. त्याविषयी पालिकेकडे तक्रारी येत आहेत. खड्डे घेतल्यास ते पूर्ववत करण्याची जबाबदारी संबंधित मंडळांचीच आहे.**




त्यांनी तसे न केल्यास त्यांच्यावर कारवाई देखील होऊ शकते, असा इशारा महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी दिला आहे.गणेश मंडळांनी मांडव उभारण्यासाठी खड्डे खोदले आहेत. याच्या काही तक्रारी देखील नागरिकांकडून पालिकेला मिळाल्या असल्याचे पालिका आयुक्तांनी सांगितले. खड्डे घेतल्यास ते बुजवून पुन्हा पूर्वीप्रमाणे करण्याची जबाबदारी संबंधित गणेश मंडळांचीच आहे. त्यांनी याकडे दुर्लक्ष करण्याचा प्रयत्न केल्यास त्यांच्यावर कारवाई होऊ शकते. गणेश मंडळांनी हे खड्डे न बुजविल्यास त्यांना पालिकेच्या माध्यमातून दिली जाणारी परवानगी देखील रद्द होऊ शकते, असे पालिका आयुक्त राजेंद्र भोसले यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. शहरात गेल्या काही दिवसांपासून पडत असलेल्या पावसामुळे रस्त्यांची अक्षरशः चाळण झाली आहे. महापालिकेने यापूर्वी बुजविलेले अनेक खड्डे पुन्हा तयार झाले असून, अनेक भागात नवीन खड्डे तयार झाले आहेत. या पार्श्वभूमीवर रस्त्यांवर पडलेले खड्डे बुजविण्यासाठी पुन्हा विशेष मोहीम राबवा.

### पावसामुळे रस्त्यांची अक्षरशः चाळण

अशा सूचना पालिका आयुक्त भोसले यांनी पथ विभागाला दिल्या आहेत.शहरात गेल्या चार ते पाच दिवसांपासून जोरदार पाऊस पडत आहे. त्यामुळे पालिकेने यापूर्वी तात्पुरत्या स्वरुपात दुरुस्त केलेले खड्डे पुन्हा तयार झाले आहेत. काही ठिकाणी पाणी साचून किंवा अन्य कारणांमुळे हे खड्डे तयार झाले आहेत. याची माहिती घेऊन पावसाने उघडीप देताच ते खड्डे बुजवावेत, अशाही सूचना दिल्याचे भोसले यांनी सांगितले.शहरातील रस्त्यांवर खड्डे पडलेले आहेत. पावसाने थोडी उघडीप देताच गणेश चतुर्थीपूर्वी खड्डे बुजविण्यासाठी विशेष मोहीम घेतली जाईल.शहरात गेल्या काही दिवसांपासून पडत असलेल्या पावसामुळे रस्त्यांची अक्षरशः चाळण झाली आहे. अनेक भागात नवीन खड्डे तयार झाले आहेत.

# कचरावेचकांच्या मुलांना अर्थसहाय्य!

## महानगरपालिका प्रशासनाचा पुढाकार : विविध योजनांसाठी स्थायी समितीची मान्यता

। पिंपरी। प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या हद्दीतील कचरावेचक व्यक्तींच्या पाल्यांसाठी शैक्षणिक अर्थसहाय्य देण्याच्या विषयासह महापालिका सभा आणि स्थायी समिती सभेची मान्यता आवश्यक असलेल्या विविध विषयांना प्रशासक शेखर सिंह यांनी आज झालेल्या बैठकीत मान्यता दिली.**





येथील महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय भवनामध्ये पार पडलेल्या या बैठकीस अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, अतिरिक्त आयुक्त तथा नगरसचिव चंद्रकांत इंदलकर तसेच विषयाशी संबंधित विभागप्रमुख आणि अधिकारी उपस्थित होते.पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीत राहत असलेले व कचरावेचकांचे काम करणाऱ्या व्यक्तींच्या मुलांचे जीवनमान उंचविण्याच्या तसेच त्यांच्या सक्षमीकरणाच्या दृष्टीकोनातून महापालिकेच्या वतीने शैक्षणिक अर्थसहाय्य देण्याच्या योजनेस प्रशासक शेखर सिंह यांनी आज झालेल्या बैठकीत मान्यता दिली. योजनेचे स्वरुप : पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील इयत्ता १ ली ते १० वी मध्ये शिकणाऱ्या कचरावेचकांच्या मुलांसाठी वार्षिक अर्थसहाय्य. लाभाचे स्वरुप – इयत्ता १ ली ते ७ वी मध्ये शिकत असलेल्या कचरावेचक पालकांच्या पाल्यांना वार्षिक ४ हजार रुपये अर्थसहाय्य महापालिकेच्या वतीने करण्यात येणार आहे. तसेच इयत्ता ८ वी ते १० वी मध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना ६ हजार रुपये वार्षिक अर्थसहाय्य देण्यात येणार आहे. अटी व शर्ती: अर्जदाराने अर्जासोबत महापालिका हद्दीमधील आधारकार्ड जोडणे आवश्यक आहे. महापालिका हद्दीमधील मतदार ओळखपत्र किंवा मतदार यादीची प्रत (पालकांची ) या दोन्हींपैकी एक पुरावा जोडणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांची मागील वर्षी उत्तीर्ण झाल्याबाबतची गुणपत्रिकेची प्रत, सध्याच्या इयत्तेमध्ये प्रवेश घेतल्याचे बोनाफाईड प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. कचरावेचक पालक नोंदणीकृत कचरावेचक संघटनेचे सभासद असल्याचे प्रमाणपत्र देखील सोबत जोडणे आवश्यक आहे. या योजनेचा लाभ लाभार्थ्यांना ई.सी.एस.द्वारे देण्यात येणार असल्याने अर्जदाराने स्वतःचे अथवा पालकांच्या नावे बँक खाते असलेले अद्ययावत पासबुकची प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मागासवर्गीय कल्याणकारी योजना किंवा इतर कल्याणकारी योजनेच्या अंतर्गत शिष्यवृत्ती देणे यापैकी एकाच योजनेचा लाभ देय राहिल, याची अर्जदारांनी नोंद घ्यावी.

### कचरावेचकांच्या पाल्यांच्या शिक्षणासाठी वार्षिक बक्षिस...

योजनेचे स्वरुप : इयत्ता १० वी व १२ वी मध्ये ५० टक्क्यांपेक्षा जास्त गुण संपादन करणा-या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील कचरावेचक पालकांच्या पाल्यास अर्थसहाय्य देण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्य् शिक्षण मंडळाच्या माध्यमिक (एस.एस.सी.) व उच्च माध्यमिक (एच.एस.सी.)परीक्षा उतीर्ण विद्यार्थ्यांना तसेच आणि केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (सी.बी.एस.सी.) आणि आय.सी.एस.सी अंतर्गत येणाऱ्या शाळांमधील कचरावेचकांच्या मुलांसाठी अर्थसहाय्य देण्यात येणार आहे. लाभाचे स्वरुप : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाअंतर्गत येणाऱ्या शाळांमधील इयत्ता १० वी मध्ये ५० टक्क्यांपेक्षा जास्त गुण संपादन करणा-या विद्यार्थ्यांना १० हजार रुपये बक्षीस देण्यात येणार आहे. सी.बी.एस.सी. बोर्ड तसेच आय.सी.एस.सी. बोर्ड अंतर्गत येणाऱ्या शाळांमधील इयत्ता १० वी मध्ये ५० टक्क्यांपेक्षा जास्त गुण संपादन करणा-या विद्यार्थ्यांना ५ हजार रुपये बक्षीस म्हणून देण्यात आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाअंतर्गत येणाऱ्या शाळांमधील इयत्ता १२ वी मध्ये ५० टक्क्यांपेक्षा जास्त गुण संपादन करणा-या विद्यार्थ्यांना महापालिकेच्या वतीने १५ हजार रुपये बक्षीस देण्यात येणार आहे. सी.बी.एस.सी. बोर्ड तसेच आय.सी.एस.सी. बोर्ड अंतर्गत येणाऱ्या शाळांमधील इयत्ता १२ वी मध्ये ५० टक्क्यांपेक्षा जास्त गुण संपादन करणा-या विद्यार्थ्यांना ७ हजार ५०० रुपये बक्षीस म्हणून देण्यात येणार आहेत.अटी व शर्ती : अर्जदाराने अर्जासोबत पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीमधील आधारकार्ड जोडणे आवश्यक आहे. तसेच महानगरपालिका हद्दीमधील मतदार ओळखपत्र किंवा मतदार यादीची प्रत (पालकांची ) या दोन्हींपैकी एक पुरावा जोडावा. मागील वर्षी उत्तीर्ण झाल्याबाबतची गुणपत्रिकेची प्रत तसेच सध्याच्या इयत्ते मध्ये प्रवेश घेतल्याचे बोनाफाईड अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. कचरावेचक पालक नोंदणीकृत कचरावेचक संघटनेचे सभासद असलेचे प्रमाणपत्र सोबत आवश्यक आहे. या योजनेचा लाभ हा ई.सी.एस. द्वारे देण्यात येणार असल्याने, अर्जदाराने स्वत. चे अथवा पालकांचे नावे बँक खाते असलेले अद्ययावत पासबुकची प्रत जोडणे आवश्यक आहे.

### पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील कचरावेचकांच्या मुलांना मोफत सायकल योजनेचे स्वरुप :

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील इयत्ता ८ वी ते १० वी मध्ये ५०टक्के व त्यापेक्षा जास्त गुण संपादन करणा-या कचरावेचकांच्या मुलांसाठी मोफत सायकल उपलब्ध करून देण्यासाठी महापालिकेच्या वतीने अर्थसहाय्य करण्यात येणार आहे. लाभाचे स्वरूप: कचरावेचकांच्या पाल्यांसाठी मोफत सायकल उपलब्ध करून देण्यासाठी इयत्ता ८ वी ते १०वी च्या विद्यार्थ्यांना ७ हजार रुपये अर्थसहाय्य महापालिकेच्या वतीने देण्यात येणार आहे.

**अटी व शर्ती :** अर्जदाराने अर्जासोबत पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीमधील आधारकार्ड जोडणे आवश्यक आहे. तसेच महानगरपालिका हद्दीमधील मतदार ओळखपत्र किंवा मतदार यादीची प्रत (पालकांची ) या दोन्हींपैकी एक पुरावा जोडावा. मागील वर्षी उत्तीर्ण झाल्याबाबतची गुणपत्रिकेची प्रत तसेच सध्याच्या इयत्तेमध्ये प्रवेश घेतल्याचे बोनाफाईड अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

कचरावेचक पालक नोंदणीकृत कचरावेचक संघटनेचे सभासद असलेचे प्रमाणपत्र सोबत आवश्यक आहे. या योजनेचा लाभ हा ई.सी.एस. द्वारे देण्यात येणार असल्याने, अर्जदाराने स्वत. चे अथवा पालकांचे नावे बँक खाते असलेले अद्ययावत पासबुकची प्रत जोडणे आवश्यक आहे.

# तळेगाव-चाकण-शिक्रापूर महामार्गाला 'गती' द्या!

## एमएसआयडीसीचे मुख्य अभियंता रणजीत हांडे : केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे मागणी

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज



दररोजच्या कोंडीमुळे त्रस्त झालेल्या स्थानिक रहिवासी, वाहनचालक आणि एमआयडीसी कामगारांना दिलासा मिळावा, यादृष्टीने गेली अनेक वर्षे रेंगाळलेल्या तळेगाव-चाकण-शिक्रापूर महामार्गाच्या कामाला एमआयडीसीकडे हस्तांतरण करून गती द्यावी, अशी मागणी राज्य राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ (एमएसआयडीसी) चे मुख्य अभियंता रणजीत हांडे यांना करण्यात आली. तळेगाव-चाकण- शिक्रापूर आणि वाघोली ते शिरूर या दोन्ही प्रस्तावित उन्नत महामार्गांची बांधणी राज्य शासनाने नव्याने स्थापन केलेल्या राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ अर्थात एमएसआयडीसीच्या माध्यमातून व्हावी, अशी मागणी सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे गेल्या जुलै महिन्यात विशेष पत्राद्वारे केली आहे. या पार्श्वभूमीवर दोन्ही राष्ट्रीय महामार्गांच्या कामाची व्यवहार्यता आणि वस्तुस्थिती जाणून घेण्याच्या हेतूने पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गाचे समन्वयक दिलीप मेदगे, अ‍ॅड. अशोक फडके आणि अमोल पवार यांनी एमएसआयडीसीचे मुख्य अभियंता रणजीत हांडे यांची मुंबई येथे भेट घेतली.

### कॅबिनेटच्या मंजुरीअभावी काम प्रलंबित

गेल्या १४ फेब्रुवारी २०२४ ला तळेगाव-चाकण-शिक्रापूर चार पदरी उन्नत महामार्गाच्या कामाची निविदा प्रक्रिया राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडून राबविण्यात आली होती. परंतु, आचारसंहितेपर्यंत या रस्त्याला कॅबिनेटची मंजुरी न मिळाल्यामुळे या रस्त्याचे काम रेंगाळले आहे.




**देशातील खेड्यापाड्यांतील महिलांत आपली सामाजिक, आर्थिक उन्नती साधण्याची जिद्द आहे, मात्र कधी पुरेशा भांडवलाअभावी, कधी मार्गदर्शनाअभावी, तर कधी कुटुंबाच्या पाठबळाअभावी त्यांच्या वाटेत अडथळे उभे राहतात. केंद्र सरकारची लखपती दीदी योजना हे अडथळे दूर करणार आहे. महाराष्ट्रात २५ लाख महिलांना 'लखपती दीदी' करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.**

# आर्थिक सक्षमतेसाठी 'लखपती दीदी'



महिलांना स्वत:च्या पायांवर उभे राहण्यास प्रोत्साहन देणारी आणि त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणारी 'लखपती दीदी' ही केंद्र सरकारची एक अभिनव योजना आहे. जळगाव येथे रविवारी (२५ ऑगस्ट) लखपती दीदी संमेलन झाले. त्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या १० वर्षांत एक कोटी महिला लखपती दीदी झाल्याचे सांगून गेल्या दोन महिन्यांत एकूण ११ लाख महिलांनी हे लक्ष्य साध्य केल्याची माहिती दिली. एकूण तीन कोटी महिलांना लखपती दीदी करण्याचे उद्दिष्ट केंद्राने निश्चित केले आहे. पंतप्रधानांनी संमेलनापूर्वी निवडक ८० लखपती दीदींशी संवाद साधला. ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार, ग्रामविकास व पंचायतराज विभाग, उमेद- महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन्नोनती अभियानांतर्गत हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.उमेद- अर्थातच महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान ग्रामविकास व पंचायतराज विभागाअंतर्गत राबविण्यात येत आहे. महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणारे, त्यांना आत्मनिर्भर करून स्वत:ची ओळख निर्माण करण्यासाठी मदतीचा हात देणारे, त्यांच्यात नवा विश्वास निर्माण करून नवी क्षितिजे पादाक्रांत करण्याचे बळ देणारे, ग्रामीण महिलांच्या हक्काचे हे व्यासपीठ आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनानुसार देशभरात लखपती दीदी निर्माण करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्याच्या दिशेने एक पाऊल म्हणून महाराष्ट्रात २५ लाख लखपती दीदी तयार करण्याचे कार्य हाती घेण्यात आले असून ते आता पूर्णत्वास जाण्याच्या मार्गावर आहे. लखपती दीदींचे वार्षिक उत्पन्न किमान एक लाख रुपयांपेक्षा पुढे जावे यासाठी त्यांना दोन किंवा दोनपेक्षा अधिक व्यवसाय संधी निर्माण करून दिल्या जाणार आहेत.या योजनेअंतर्गत अभियानातील महिलांना बँकेचे व्यवहार शिकविले जातात. त्यांना आर्थिकदृष्ट्या साक्षर केले जाते. कृषीविषयक माहितीसाठी अभियानात 'कृषी सखी' आहेत, बँकविषयक मदतीसाठी 'बँक सखी' आहेत. अशा विविध क्षेत्रांत प्रशिक्षित असलेल्या व्यक्ती अभियानात आहेत. तसेच मोठ्या प्रमाणात कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी राष्ट्रीयीकृत बँकांकडून कमी व्याजदरात कर्ज उपलब्ध करून दिले जाते. उमेद अभियानात २०२३-२४ या आर्थिक वर्षात एकूण आठ हजार ९७४ कोटी रुपयांचे कर्ज वितरित करण्यात आले असून आजपर्यंतच्या इतिहासातील हे सर्वांत मोठे कर्ज म्हणूनदेखील गणले गेले आहे. ग्रामीण भारतातील गरिबीच्या निर्मूलनासाठी केंद्र शासनाने २०११ मध्ये 'राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियाना'ची सुरुवात केली. अभियानामध्ये ग्रामीण महाराष्ट्रातील गरीब व जोखीमग्रस्त कुटुंबांना समृद्ध, आत्मसन्मानाचे व सुरक्षित जीवन जगता यावे, यासाठीच्या तरतुदी केल्या आहेत. त्यांच्या सर्वसमावेशक, लोकशाही तत्त्वावर आधारित स्वयंचलित समुदाय संस्थांची निर्मिती करण्यात आली आहे. सहभागी होणाऱ्यांचे अधिकार व हक्क अबाधित राहावेत, विविध वित्तीय सेवा, तसेच शाश्वत उपजीविकेच्या संधी प्राप्त होण्याच्या दृष्टीने पोषक वातावरणाची निर्मिती व्हावी, यासाठी उमेदमार्फत प्रयत्न करण्यात येत आहेत. उमेद अभियानाच्या या महिला सक्षमीकरणाच्या चळवळीमध्ये आज महाराष्ट्रातील ३४ जिल्हे, ३५१ तालुक्यांतील जवळपास ६६ लाख कुटुंबे सहभागी आहेत. यातील एक लाख २५ हजारांपेक्षा जास्त गट हे गेल्या दोन वर्षांत स्थापन झाले आहेत. ३१ हजार ८१२ ग्राम संघ, एक हजार ८७५ प्रभाग संघ, १० हजार ८३ उत्पादक गट आणि ४१० पेक्षाही जास्त शेतकरी उत्पादक कंपन्या स्थापन झाल्या आहेत. या संस्थांचे दैनंदिन काम सुलभ करण्यासाठी गाव स्तरावर प्रशिक्षित समुदाय संसाधन व्यक्तींची फळी निर्माण करण्यात आली आहे.

## प्रासंगिक »

### सुधारणांची निवृत्ती!

***तो राजकीय अगतिकतेमुळे, हे लक्षात घेता राज्यांकडून अधिक बेजबाबदारपणाचीही शक्यता आहेच...***

गेल्या दहा वर्षांत सरकारी कामगार संघटनांच्या नेत्यांस भेटण्यासाठी पंतप्रधानांस वेळ मिळाला नव्हता. ताज्या निवडणुकीत मतदारांचा दणका बसल्यावर तो मिळाला आणि पाठोपाठ सरकारी कर्मचाऱ्यांच्या रोषाच्या केंद्रस्थानी असलेली नवी निवृत्तिवेतन योजनाही रद्द झाली. हा योगायोग खचितच नाही. ही केंद्राची गेल्या चार महिन्यांतील पाचवी माघार. वक्फ बोर्ड सुधारणा, वैद्यकीय विम्यावरील वस्तू-सेवा कर, प्रसारण विधेयक, सरकारी पदांवर खासगी व्यक्तींच्या नेमणुकीसारखा महत्त्वाचा निर्णय आणि आता हे निवृत्तिवेतन घूमजाव. केंद्र सरकारच्या प्रवक्त्यांनी या संदर्भात कितीही 'हे घूमजाव नाही' असा कंठशोष केला तरी वास्तव लपून राहणारे नाही. यात कृषी सुधारणा, जमीन हस्तांतरण कायदा इत्यादी आधीच्या घूमजाव निर्णयांचा समावेश केल्यास या सरकारचे वर्णन 'घूमजाव-सरकार' असे करता येईल. खरे तर ताजी माघार ज्या प्रकरणी केंद्राने घेतली.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची २४ ऑगस्ट २४ रोजी छत्तीसगडची राजधानी रायपूर येथे नक्षलग्रस्त सात राज्यांतील अधिकाऱ्यांबरोबर बैठक झाली. या बैठकीत महाराष्ट्र, छत्तीसगड, झारखंड, ओडिशा, मध्य प्रदेश, आंध्र प्रदेश आणि तेलंगणा या राज्यांचे मुख्य सचिव आणि पोलीस महासंचालक उपस्थित होते.

# सरकारवर टीका म्हणजे नक्षलवाद नव्हे!



बैठकीनंतर पत्रकार परिषदेत ते म्हणाले की, 'नक्षलवादविरोधी लढाई अंतिम टप्प्यात असून मार्च २०२६ अखेर देशातून नक्षलवाद्यांचा नायनाट केला जाईल. नक्षलवादाची समस्या गंभीर आहे. त्यामुळे नक्षलवाद संपविण्यासाठी कठोर कारवाई केली जाईल. लोकशाहीला नक्षलवाद्यांचा मोठा धोका आहे. गेल्या चार वर्षांत नक्षलवाद्यांमुळे १७ हजारांहून अधिक लोकांचा बळी गेला आहे. त्यामुळे त्यांचा बीमोड करण्यासाठी केंद्र सरकारने कठोर पावले टाकण्यास सुरुवात केली आहे.' नक्षलवादाचा बीमोड हा खरंच अतिशय महत्त्वाचा गंभीर विषय आहे. केंद्रीय गृहमंत्री आगामी दीड वर्षात त्याचा बिमोड करू असे म्हणतात हे स्वागतार्ह आहे. मात्र त्यासाठी नक्षलवादाचा इतिहास लक्षात घेऊन त्याचे योग्य प्रकारे निर्दालन करण्यासाठी फार कठोर पावले उचलावी लागतील आणि योग्य प्रकारे नियोजनही करावे लागेल.नक्षलवाद्यांचे हल्ले आणि त्यातून होणारी मोठी हानी हा गेल्या अनेक दशकांपासून चिंतेचा विषय आहे. नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात अनेक जवान, नेते, सर्वसामान्य नागरिक बळी गेले आहेत. मोठ्या प्रमाणात मनुष्यहानी प्रमाणेच वित्तहानीही झाली आहे. डॉ. मनमोहन सिंग पंतप्रधान असताना केंद्र सरकारने ६ जून २००९ रोजी नक्षलवादविरोधी धोरणाचा १४ कलमी मसुदाही तयार केला होता. पण अंमलबजावणीच्या दृष्टीने तो तकलादू ठरला. गेल्या दहा वर्षांत विद्यमान केंद्र सरकारनेही फार मोठे यश मिळवले आहे असे दिसत नाही.नक्षलवादाबाबतचा सरकारी दृष्टिकोन अभ्यासपूर्ण नाही हे आजवर वारंवार स्पष्ट झाले आहे. अनेकदा तर परिवर्तनवादी पुरोगामी काम करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांचीही नावे चक्क नक्षलवाद्यांच्या यादीत समाविष्ट झाल्याचे दिसून आले होते. मानवतावादी संघटना नक्षलवाद विरोधाची धार बोथट करतात असाही आरोप काही राजकारण्यांनी केला. अर्थात अलीकडे सामाजिक, परिवर्तनवादी संस्था -संघटनांमध्ये सक्रिय राहून शहरी भागातही आपले बस्तान बसवायचे नक्षलवाद्यांचे प्रयत्न नाकारता येत नाहीत. हे खरे असले तरी नक्षलवादी कुणाला म्हणायचे याबाबत सरकारी यंत्रणा संभ्रमात आहे, हे वारंवार दिसून आले आहे. शासनाच्या धोरणांवर टीका करणारा, डावा पुरोगामी विचार मांडणारा, सर्वांगीण विषमता नष्ट झाली पाहिजे असे म्हणणारा जो कोणी असेल तो नक्षलवादी आहे असे जर शासन मानणार असेल तर बहुसंख्य जनतेलाच नक्षलवादी म्हणावे लागेल. नक्षलवाद हा घटनाविरोधी आहे. देशाला त्यापासून धोका आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# खरा मावळा फोटो व्हायरल करणार नाही

## फडणवीसांनी विरोधकांवर जोरदार टीका केली

। मुंबई ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**सिंधुदुर्गातील राजकोट किल्ल्यावर उभारण्यात आलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळला आहे. यानंतर विरोधकांनी सरकारवर टीका करत आरोपांच्या फैरी झाडल्या आहेत. पुतळ्याचा दर्जा निकृष्ट होता, अशा प्रकारचा पुतळासरकारने उभा केलाच कसा काय? असा प्रश्न विचारला जातो आहे. अशात आता महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत विरोधकांवर जोरदार टीका केली आहे.**





मालवण राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराज यांचा पूर्णाकृती पुतळाकोसळल्याच्या घटनेनंतर राज्यातील राजकीय वातावरण तापले असून विरोधकांनी यावरून राज्य सरकारला धारेवर धरले आहे. या पुतळ्याची उभारणी नौदलामार्फत करण्यात आल्याचे स्पष्टीकरण राज्य सरकारने दिले असले तरी, विरोधी पक्षांनी सार्वजनिक बांधकाम विभागावर या दुर्घटनेचे खापर फोडले आहे. या घटनेस सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण हे जबाबदार असून त्यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी माजी आमदार परशुराम उपरकर यांनी केली तर, रवींद्र चव्हाण आणि बांधकाम विभागाचे अधिकारी यांच्याविरोधात फौजदारी गुन्हा दाखल करावा, अशी मागणी माजी खासदार विनायक राऊत यांनी केली. तसंच राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्ष, शिवसेना उबाठा, काँग्रेस या पक्षाच्या नेत्यांनीही राज्य सरकारवर टीका केली. आता देवेंद्र फडणवीस यांनी यावर उत्तर दिलं आहे."छत्रपती शिवाजी महाराज हे आमचं दैवत आहेत. दहीहंडीच्या दिवशी गोविंदा पथकाने सुंदर असा अफझल खान वधाचा देखावा सादर केला. एवढे थर लावून तो प्रसंग आम्ही पाहिला. आमच्या अंगावरही रोमांच उभे राहिले. अफझल खानरुपी कितीही शक्ती स्वराज्यावर चालून आल्या तरीही त्यांचा कोथळा लोकशाही पद्धतीने आम्ही बाहेर काढू." "छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळणे ही दु:खदायक घटना आहे. सगळ्यांनाच वेदना झाल्या आहेत. यावर कोणीही राजकारण करु नये. महाराष्ट्र सरकारने पुतळा उभारला नव्हता तर नौदलाने उभारला होता. ज्यांना हे काम देण्यात आलं त्यांना कदाचित इतक्या वेगाने तिथे वारे वाहतात याचं आकलन शिल्पकाराला करता आले नसावे. आता आम्ही नौदलाच्या मदतीने त्याच ठिकाणी आम्ही नवा पुतळा उभारू. पण या दुर्घटनेनंतर पुतळ्याचे भग्न अवस्थेतील काही फोटो व्हायरल करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराजांचा खरा मावळा हे फोटो व्हायरल करणार नाही, यावर राजकारण करणं हा खुजेपणा आहे." अशी टीका देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांवर केली.मालवण राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराज यांचा पूर्णाकृती पुतळा कोसळल्याच्या घटनेनंतर राज्यातील राजकीय वातावरण तापले असून विरोधकांनी यावरून राज्य सरकारला धारेवर धरले आहे. या पुतळ्याची उभारणी नौदलामार्फत करण्यात आल्याचे स्पष्टीकरण राज्य सरकारने दिले असले तरी, विरोधी पक्षांनी सार्वजनिक बांधकाम विभागावर या दुर्घटनेचे खापर फोडले आहे. या घटनेस सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण हे जबाबदार असून त्यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी माजी आमदार परशुराम उपरकर यांनी केली तर, रवींद्र चव्हाण आणि बांधकाम विभागाचे अधिकारी यांच्याविरोधात फौजदारी गुन्हा दाखल करावा, अशी मागणी माजी खासदार विनायक राऊत यांनी केली. तसंच राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्ष, शिवसेना उबाठा, काँग्रेस या पक्षाच्या नेत्यांनीही राज्य सरकारवर टीका केली. आता देवेंद्र फडणवीस यांनी यावर उत्तर दिलं आहे."छत्रपती शिवाजी महाराज हे आमचं दैवत आहेत.

दहीहंडीच्या दिवशी गोविंदा पथकाने सुंदर असा अफझल खान वधाचा देखावा सादर केला. एवढे थर लावून तो प्रसंग आम्ही पाहिला. आमच्या अंगावरही रोमांच उभे राहिले. अफझल खानरुपी कितीही शक्ती स्वराज्यावर चालून आल्या तरीही त्यांचा कोथळा लोकशाही पद्धतीने आम्ही बाहेर काढू.

### पुतळ्याचे काही फोटो व्हायरल

महाराजांचा पुतळा कोसळणे ही दु:खदायक घटना आहे. सगळ्यांनाच वेदना झाल्या आहेत. यावर कोणीही राजकारण करु नये. महाराष्ट्र सरकारने पुतळा उभारला नव्हता तर नौदलाने उभारला होता. ज्यांना हे काम देण्यात आलं त्यांना कदाचित इतक्या वेगाने तिथे वारे वाहतात याचं आकलन शिल्पकाराला करता आले नसावे. आता आम्ही नौदलाच्या मदतीने त्याच ठिकाणी आम्ही नवा पुतळा उभारू. पण या दुर्घटनेनंतर पुतळ्याचे भग्न अवस्थेतील काही फोटो व्हायरल करण्यात आले.

# शिवरायांचा पुतळा अपघाताने कोसळला : केसरकर

## अपघाताने आलेल्या सरकारचं कामकाजच अपघाती : वडेट्टीवार

। मुंबई ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मालवण येथील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा अपघाताने पडला, असं विधान आज मंत्री दीपक केसरकर यांनी केलं होतं. त्यांच्या या विधानानंतर आता विविध राजकीय प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. राज्याचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनीही यावरून दीपक केसरकर यांच्यावर टीकास्र सोडलं आहे. एक्स या समाज माध्यमावर पोस्ट करत त्यांनी यासंदर्भात प्रतिक्रिया दिली.**

अपघाताने आलेल्या सरकारचं सगळं कामकाजच अपघाती आहे. महाराष्ट्राच्या नशिबात हे महाविनाशी सरकार आले, हाच महाराष्ट्रातील जनतेसाठी मोठा अपघात आहे. ज्यातून या राज्याला सावरायला खूप वेळ जाईल", असं विजय वडेट्टीवार म्हणाले.

पुढे बोलताना, "बदलापूर प्रकरण अपघात होता, समृध्दी महामार्गावर लोकांचे जीव गेले तो अपघात होता, नांदेडमधील शासकीय रुग्णालयात लोकं मेली तो अपघात होता, ठाणे शासकीय रुग्णालयात लहान बालके मेली तो अपघात होता, महाराष्ट्रभर ड्रग्सचा सुळसुळाट सुरू आहे, तो एक अपघात आहे. ललित पाटील पळाला तो अपघात होता, रोज महाराष्ट्रात महिलांवर अत्याचार होत आहेत, ते सुद्धा अपघाताने सुरू आहे. असे एक ना अनेक अपघात महाराष्ट्रात सुरू आहेत", अशी टीकाही विजय वडेट्टीवार यांनी केली.





"तीन ड्रायव्हर आणि एक स्टिअरिंग असल्यावर स्टिअरिंग हातात घेण्यासाठी मीच किती मोठा जनतेचा रखवाला आहे, हे दाखवण्यासाठी जी धडपड तिघांची सुरू आहे, त्यामुळेच हे सगळे अपघात घडत आहेत", असा टोलाही त्यांनी महायुती सरकारला लगावला.छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळणं हा एक अपघात आहे. त्यामुळे नागरिकांनी या पद्धतीने याकडे बघावं, कदाचिक वाईटातून चांगलं घडायचं असेल आणि त्यामुळे हा अपघात घडला असेल. हा अपघात नेमका कसा घडला. याचा तपास सुरू आहे. यात जे कुणी दोषी असतील, त्यांच्यावर कारवाई सुद्धा होईल.

### केसरकर नेमकं काय म्हणाले होते?

पण कारवाई केल्याने जखमी भरून येत नाही. जखमा भरून यायच्या असतील, तर अतिशय भव्य पुतळा याठिकाणी उभा करावा लागेल. महाराजांसाठी तीच खरी आदरांजली ठरेल", असं दीपक केसरकर म्हणाले होते.मालवण येथील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा अपघाताने पडला, असं विधान आज मंत्री दीपक केसरकर यांनी केलं होतं. त्यांच्या या विधानानंतर आता विविध राजकीय प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. राज्याचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनीही यावरून दीपक केसरकर यांच्यावर टीकास्र सोडलं आहे. एक्स या समाज माध्यमावर पोस्ट करत त्यांनी यासंदर्भात प्रतिक्रिया दिली.

# पुतळा कोसळणं खूपच वेदनादायी!

## दोषींवर कठोरात कठोर कारवाई व्हायला हवी: अखिलेश यादव

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**भारतीय नौदलाने सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण येथील राजकोट किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा पूर्णाकृती पुतळा उभारला होता. गेल्या वर्षी नौदल दिनाचे (४ डिसेंबर) औचित्य साधून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आणि मुख्यमंत्री एकनाथ यांच्या उपस्थितीत या पुतळ्याचं लोकार्पण करण्यात आलं होतं. १५ फूट उंचीचा चबुतरा आणि त्यावर २८ फूट उंचीचा शिवाजी महाराजांचा रुबाबदार पुतळा अशी या स्मारकाची रचना होती. मात्र लोकार्पणानंतर अवघ्या आठ महिन्यात हा पुतळा कोसळला आहे. सोमवारी (२६ ऑगस्ट) दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास हा पुतळा कोसळला. या पुतळ्यावरून आता महाराष्ट्राचं राजकारण तापलं आहे. राज्यातील विरोधी पक्ष सरकारवर टीका करत आहे. तसेच ही घटना पाहून शिप्रेमींमध्ये संतापाची लाट उसळली आहे.**



दरम्यान, या घटनेवर देशभरात प्रतिक्रिया येऊ लागल्या आहेत. समाजवादी पार्टीचे प्रमुख व उत्तर प्रदशचे माजी मुख्यमंत्री अखिलेश यादव यांनी देखील या घटनेवर प्रतिक्रिया दिली आहे. तसेच त्यांनी याप्रकरणी चौकशी करण्याची मागणी केली आहे. या चौकशीत जे-जे लोक दोषी आढळतील त्यांच्यावर कठोरात कठोर कारवाई व्हायला हवी, असं यादव म्हणाले. याबाबत यादव यांनी एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट केली आहे.अखिलेश यादव यांनी म्हटलं आहे की "भाजपाने आतापर्यंत ज्या-ज्या वास्तूंची निर्मिती केली आहे त्या केवळ भ्रष्टाचाऱ्यांना भेट म्हणून बनवल्या गेल्या आहेत. स्वतः पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महाराष्ट्रातील सिंधुदुर्ग येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचं अनावरण केलं होतं. तो पुतळा कोसळणं ही खूपच वेदनादायी व दुर्दैवी घटना आहे. या पुतळ्याच्या बांधकामाशी संबंधित सर्व सरकारी व निमसरकारी लोकांची सखोल चौकशी करून त्यांच्यावर कठोर व दंडात्मक कारवाई करायला हवी. या घटनेने केवळ महाराष्ट्रातील लोकांच्याच नव्हे तर संपूर्ण देशातील नागरिकांच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत. महाराष्ट्रातील जनता आगामी निवडणुकीत भाजपाच्या भ्रष्टाचारी कुकृत्यांना सडेतोड उत्तर देईल व त्यांचं भ्रष्ट सरकार पाडेल".एनडीटीव्हीने दिलेल्या वृत्तानुसार या घटनेनंतर कंत्राटदार जयदीप आपटे आणि स्ट्रक्चरल कन्सल्टंट चेतन पाटील यांच्याविरोधात भारतीय न्याय संहिताच्या अनेक कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भ्रष्टाचार, फसवणूक आणि सार्वजनिक सुरक्षा धोक्यात आणणे आदी कलमांचाही यात समावेश आहे.भारतीय नौदलाने सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण येथील राजकोट किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा पूर्णाकृती पुतळा उभारला होता. गेल्या वर्षी नौदल दिनाचे (४ डिसेंबर) औचित्य साधून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आणि मुख्यमंत्री एकनाथ यांच्या उपस्थितीत या पुतळ्याचं लोकार्पण करण्यात आलं होतं. १५ फूट उंचीचा चबुतरा आणि त्यावर २८ फूट उंचीचा शिवाजी महाराजांचा रुबाबदार पुतळा अशी या स्मारकाची रचना होती. मात्र लोकार्पणानंतर अवघ्या आठ महिन्यात हा पुतळा कोसळला आहे. सोमवारी (२६ ऑगस्ट) दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास हा पुतळा कोसळला. या पुतळ्यावरून आता महाराष्ट्राचं राजकारण तापलं आहे. राज्यातील विरोधी पक्ष सरकारवर टीका करत आहे. तसेच ही घटना पाहून शिप्रेमींमध्ये संतापाची लाट उसळली आहे.दरम्यान, या घटनेवर देशभरात प्रतिक्रिया येऊ लागल्या आहेत. समाजवादी पार्टीचे प्रमुख व उत्तर प्रदशचे माजी मुख्यमंत्री अखिलेश यादव यांनी देखील या घटनेवर प्रतिक्रिया दिली आहे. तसेच त्यांनी याप्रकरणी चौकशी करण्याची मागणी केली आहे.

### आतापर्यंत काय कारवाई झाली?

या चौकशीत जे-जे लोक दोषी आढळतील त्यांच्यावर कठोरात कठोर कारवाई व्हायला हवी, असं यादव म्हणाले. याबाबत यादव यांनी एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट केली आहे.अखिलेश यादव यांनी म्हटलं आहे की "भाजपाने आतापर्यंत ज्या-ज्या वास्तूंची निर्मिती केली आहे त्या केवळ भ्रष्टाचाऱ्यांना भेट म्हणून बनवल्या गेल्या आहेत. स्वतः पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महाराष्ट्रातील सिंधुदुर्ग येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचं अनावरण केलं होतं. या घटनेने केवळ महाराष्ट्रातील लोकांच्याच नव्हे तर संपूर्ण देशातील नागरिकांच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत. महाराष्ट्रातील जनता आगामी निवडणुकीत भाजपाच्या भ्रष्टाचारी कुकृत्यांना सडेतोड उत्तर देईल व त्यांचं भ्रष्ट सरकार पाडेल".

# कोलकाता हत्या प्रकरणातील आंदोलन चिघळले

## कोलकाता पोलिसांकडून अश्रूधुराच्या नळकांड्याचा वापर!

। नवी दिल्ली ।
**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**कोलकात्यातील प्रशिक्षणार्थी डॉक्टरवरील बलात्कार आणि हत्या प्रकरणी पश्चिम बंग छात्र समाजाच्या विद्यार्थ्यांनी आज कोलकाता कॉलेज स्क्वेअर येथून राज्य सचिवालय नबान्नाच्या दिशेने मोर्चा काढला. मात्र, या मोर्चाला बेकायदा मोर्चा म्हणत कोलकाता पोलिसांनी आदोलकांवर पाण्याचा फवारा मारत अश्रूधूराच्या नळकांड्याचा वापर केला.**




आरजी कार हॉस्पिटलमधील प्रशिक्षणार्थी डॉक्टरवर झालेल्या कथित बलात्कार आणि हत्येच्या प्रकरणात पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या राजीनाम्याची मागणी करण्याकरता 'मार्च टू नबन्ना' आंदोलन करण्यात आले.आंदोलनकर्त्यांनी बॅरिकेड्स तोडून पोलिसांवर दगडफेक केली. विद्यार्थी संघटनेला पाठिंबा देणाऱ्या भाजपाने दावा केला आहे की, पोलिसांनी लाठीचार्ज केल्याने अनेक आंदोलक जखमी झाले आहेत. 'मार्च टू नबन्ना'करता पोलिसांनी कोणतीही परवानगी दिली नव्हती. तसंच, या मोर्चादरम्यान हिंसाचार घडवण्याचा प्रयत्न करत असल्याचा दावा सत्ताधारी तृणमूल काँग्रेसने केला होता. कोलकाता पोलिसांनी नबान्नाच्या चहूबाजूंनी सुरक्षित केलं आहे. तसंच, आंदोलकांना कोणत्याही मार्गाने सचिवालयाकडे जाण्यापासून रोखलं. याकरता जवळपास ६ हजार पोलीस कर्मचारी तैनात करण्यात आले. आंदोलकांवर लक्ष ठेवण्यासाठी ड्रोनचाही वापर करण्यात आला.

### आंदोलकांनी बॅरिकेड्स तोडले

बॅरिकेड्स तोडू नये म्हणून ते जमिनीत ग्रीस करण्यात आले आहेत. आज सकाळी आंदोलकांचा एक गट कॉलेज चौकात जमला आणि त्यांनी नबान्नाकडे कूच केली. बलात्कार आणि हत्या प्रकरणावरून मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या राजीनाम्याची मागणी करत त्यांनी घोषणाबाजी केली. या आंदोलनात अनेक विद्यार्थी संघटना आणि नागरिक मंच सहभागी झाले आहेत. दुपारी १ च्या सुमारास हावडा आणि कोलकाता येथील विविध भागांतून निदर्शकांनी भारताचा झेंडा फडकावत सरकारविरोधी घोषणाबाजी करत राज्य सचिवालय 'नबान्न'कडे मोर्चा काढला.

## नीना गुप्ता लवकरच होणार आजी

ज्येष्ठ अभिनेत्री नीना गुप्ता (NEENA GUPTA) लवकरच आजी होणार आहेत. त्यांची लेक लोकप्रिय अभिनेत्री, फॅशन डिझायनर मसाबा गुप्ता गरोदर आहे. रविवारी मसाबाचे डोहाळे जेवण पार पडले. या कार्यक्रमाचे काही फोटो समोर आले आहेत. या फोटोंमधील बॉलीवूडमधील काही अभिनेत्री दिसत आहेत.मसाबा गुप्ता लवकरच पती सत्यदीप मिश्राबरोबर आपल्या पहिल्या बाळाचे स्वागत करणार आहे. यावर्षी एप्रिल महिन्यात तिने एक पोस्ट करून ती गरोदर असल्याची माहिती दिली होती. तेव्हापासून अनेकदा ती गरोदरपणाशी संबंधित पोस्ट शेअर करते. मसाबा सोशल मीडियावर सक्रिय आहे, नुकताच तिचा डोहाळे जेवणाचा कार्यक्रम पार पडला, यात सोनम कपूर, रिया कपूरसह तिच्या अनेक मैत्रिणींची झलक पाहायला मिळाली.मसाबाच्या डोहाळे जेवणाचे काही फोटो व्हायरल होत आहेत, यात तिच्या चेहऱ्यावर प्रेग्नेन्सी ग्लो पाहायला मिळतोय. मसाबाने या खास दिवसासाठी बेज रंगाचा, फूल स्लिव्हज फिट व फ्लेअर ड्रेस निवडला. तिने हिऱ्यांचे दागिने घालून तिचा हा लूक पूर्ण केला. मसाबाचा डोहाळे जेवणाचा कार्यक्रम बॉलीवूड अभिनेते अनिल कपूर (ANIL KAPOOR) यांच्या घरी आयोजित करण्यात आला होता. सोनम कपूरने मसाबासाठी हा कार्यक्रम होस्ट केला. मसाबाने तिच्या इन्स्टाग्रामवर काही स्टोरीज शेअर केल्या आहेत, ज्यात ती हातात माइक घेऊन बोलताना दिसतेय. तिचे हे फोटो 'फिल्मीज्ञान' या पापाराझी अकाउंटवरून शेअर करण्यात आले आहेत.मसाबा गुप्ताच्या बेबी शॉवरची थीम बेज रंगाची होती. याच रंगाचे बिस्किट व इतर वस्तूदेखील होत्या. तिच्या ज्या मैत्रिणींनी या कार्यक्रमाला हजेरी लावली, त्यांनीही बेज रंगाचे कपडे घातले होते.

## ज्या घरात लग्न केलं तेच विकतेय सोनाक्षी

अभिनेत्री सोनाक्षी सिन्हाने मुंबईतील राहत्या घरी झहीर इक्बालशी (ZAHEER IQBAL) नोंदणी पद्धतीने लग्न केलं. तेच घर आता ती विकत असल्याची मोठी माहिती समोर आली आहे. सोनाक्षीचं हे पहिलं घर आहे, त्यामुळे ते तिच्यासाठी खूप खास आहे. सोनाक्षीने लग्नानंतर अवघ्या दोन महिन्यात हे घर विकण्याचा निर्णय का घेतला यामागचे कारण समोर आले आहे.बॉलीवूड अभिनेत्री सोनाक्षी सिन्हा मुंबईतील तिचं २५ कोटींचं घर विकत आहे. हे सोनाक्षीचं पहिलं घर आहे. सोनाक्षीने वांद्रेमधील याच सी फेसिंग अपार्टमेंटमध्ये तिचा बॉयफ्रेंड, अभिनेता आणि रिअल इस्टेट डेव्हलपर झहीर इक्बालशी लग्न केलं होतं. लग्नानंतर अवघ्या दोन महिन्यात ती हे घर विकणार असल्याने त्याची चांगलीच चर्चा होत आहे.सुरुवातीला असं म्हटलं जात होतं की सोनाक्षीने याच इमारतीतील दुसऱ्या मजल्यावर नवीन अपार्टमेंट खरेदी केलं आहे, त्यामुळे ती हे घर विकत आहे. पण 'इंडिया टुडे'ने सूत्रांच्या हवाल्याने या घराच्या विक्रीमागील कारण सांगितले आहे. झहीरची कंपनी बांधत असलेल्या एका इमारतीत सोनाक्षी सिन्हाने मोठे घर खरेदी केले आहे. तिने या घरात झहीरसोबत राहण्याचा निर्णय घेतला आहे. ती नव्या घरात पतीसोबत शिफ्ट होणार आहे, त्यामुळे ती वांद्रेमधील घर विकत आहे.सोनाक्षी आता हे घर विकत असली तरी ते तिच्यासाठी किती खास आहे हे तिने एका मुलाखतीत सांगितलं होतं. "माझ्या वडिलांमुळे (शत्रुघ्न सिन्हा) मला माझे स्वत:चे घर घ्यायचे होते.

## ॲमी जॅक्सनने केलं लग्न



'सिंग इज ब्लिंग' फेम अभिनेत्री ॲमी जॅक्सनने ब्रिटिश अभिनेता आणि संगीतकार एडवर्ड जॅक पीटर वेस्टविकशी लग्न केलं आहे. इटलीतील अमाल्फी बीचवर या दोघांचे डेस्टिनेशन वेडिंग पार पडले. या लग्नात ॲमीचा पाच वर्षांचा मुलगा अँड्रियासही सहभागी झाला होता. दोघांनी ख्रिश्चन पद्धतीनुसार लग्न केले. ॲमी आणि एडवर्डने लग्नाचे फोटो इन्स्टाग्राम अकाउंटवर शेअर केले आहेत.लग्नात ॲमी जॅक्सन आणि एडवर्ड वेस्टविक दोघेही खूप सुंदर दिसत होते. लग्नासाठी ॲमीने पांढरा गाउन ड्रेस निवडला तर एडवर्डने काळ्या पँटसह पांढरा सूट घातला होता. पहिल्या फोटोत एडवर्डने ॲमीला जवळ पकडून पोझ दिली आहे, तर दुसऱ्या फोटोत ते दोघेही कॅमेऱ्याकडे बघत पोझ देत आहेत. "प्रवास आता सुरू झाला आहे", असं कॅप्शन देत एडवर्डने हे फोटो इन्स्टाग्रामवर शेअर केले आहेत.ॲमी जॅक्सन आणि एडवर्ड वेस्टविक या दोघांनाही चाहते नवीन प्रवासासाठी शुभेच्छा देत आहे. ॲमीच्या लग्नात रोहिणी अय्यर सहभागी झाली होती.ॲमी जॅक्सन आणि एडवर्ड वेस्टविकने या वर्षी जानेवारीमध्ये एंगेजमेंट केली होती. त्यानंतर दोघांनी लंडनमध्ये एंगेजमेंट डिनर पार्टी आयोजित केली होती आणि जवळच्या मित्रांबरोबर त्यांच्या सेलिब्रेशन केले होते. त्यानंतर दोघेही आता इटलीत विवाहबंधनात अडकले.३२ वर्षीय ॲमी जॅक्सनचं हे पहिलंच लग्न आहे,एडवर्ड वेस्टविकशी लग्न करण्यापूर्वी ॲमी बिझनेसमन जॉर्ज पानायियोटोसह रिलेशनशिपमध्ये होती.

## रणबीर स्वत: माझ्या घरी आला

बॉलीवूड अभिनेत्री व भाजपाच्या खासदार कंगना रणौत ( KANGANA RANAUT ) सध्या त्यांचा आगामी चित्रपट 'इमर्जन्सी'मुळे चर्चेत आहेत. लवकरच हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. या चित्रपटात कंगना यांनी माजी पंतप्रधान इंदिरा गांधींची भूमिका साकारली आहे. 'इमर्जन्सी' चित्रपटानिमित्ताने कंगना रणौत ठिकठिकाणी प्रमोशन करताना दिसत आहेत. अलीकडेच त्यांनी एका मुलाखतीमध्ये 'संजू' चित्रपटात काम करण्याची संधी मिळाली होती, याचा किस्सा सांगितला. 'संजू' चित्रपटात कंगना यांनी काम करावं, यासाठी रणबीर कपूर त्यांच्या घरी गेला होता. नेमकं काय झालं होतं? वाचा...बॉलीवूडचा खलनायक म्हणून ओळखला जाणारा संजय दत्तच्या आयुष्यावर आधारित 'संजू' चित्रपट काही वर्षांपूर्वी प्रदर्शित झाला होता. राजकुमार हिरानी दिग्दर्शित 'संजू' चित्रपटात रणबीर कपूरने संजय दत्तची भूमिका साकारली होती. तर अनुष्का शर्मा, दिया मिर्झा आणि सोनम कपूर असे अनेक कलाकार महत्त्वाच्या भूमिकेत झळकले होते. याच चित्रपटात कंगना रणौत ( KANGANA RANAUT ) यांना एका भूमिकेसाठी विचारणा झाली होती. त्या म्हणाल्या, ""संजू' चित्रपटात मी करावं, यासाठी स्वतः रणबीर कपूर घरी आला होता. तो म्हणाला, 'संजू' चित्रपटात प्लीज काम कर. हा चित्रपट स्वीकार."''सिद्धार्थ कनन'ला मुलाखत देताना कंगना ( KANGANA RANAUT ) पुढे म्हणाल्या, "मी अनेक मोठ्या कलाकारांचे चित्रपट नाकारले आहेत. पण यामुळे माझं व्यावसायिक नुकसान झालं नाही." याआधी कंगना यांनी राज शमानीच्या पॉडकास्टला मुलाखत दिली होती. यावेळी त्या म्हणाल्या होत्या की, सलमान खान आणि शाहरुख खान यांचे अनेक चित्रपट मी नाकारले होते. कारण मला महिलांच्या दृष्टीकोनातून त्या भूमिका चांगल्या वाटल्या नव्हत्या. तसंच फेअरनेस क्रीम प्रमोट करण्यासाठी १० ते १५ कोटी रुपयांच्या जाहिराती आल्या होत्या, त्या सुद्धा मी नाकारल्या. कारण असं करणं हे वर्णभेदला प्रोत्साहन देण्यासारखं होतं. मी इंडस्ट्रीदरम्यान, कंगना रणौत ( KANGANA RANAUT ) यांचा बहुचर्चित 'इमर्जन्सी' चित्रपट १४ ऑगस्टला प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटात कंगना रणौत यांच्यासह अनुपम खेर, श्रेयस तळपदे, मिलिंद सोमण असे अनेक कलाकार झळकणार आहेत. याआधी कंगना यांचा 'तेजस' चित्रपट प्रदर्शित झाला होता. पण बॉक्स ऑफिसवर पाहिजे तसा प्रतिसाद न मिळाल्यामुळे फ्लॉप ठरला.

## प्रियांकाच्या भावाचा पार पडला साखरपुडा!



अभिनेत्री प्रियांका चोप्रा कायमच सोशल मीडियावर सक्रिय असते. या देसी गर्लने नुकतंच तिच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर केलेल्या पोस्टने सगळ्यांचे लक्ष वेधून घेतले आहे. ही पोस्ट आहे तिच्या भावाच्या साखरपुड्याची. अभिनेत्री प्रियांका चोप्राचा भाऊ सिद्धार्थ चोप्रा आणि नीलम उपाध्याय यांचा हस्ताक्षर विधी आणि साखरपुड्याचा कार्यक्रम २६ ऑगस्ट रोजी पार पडला. साखरपुड्याचा क्रार्यक्रम घरच्या घरी साध्या पद्धतीने विधिवत करण्यात आला. या कार्यक्रमात कुटुंबातील माणसे, नातेवाईक आणि मित्रमंडळी उपस्थित होते.भावाच्या साखरपुड्याचा व्हिडीओ पोस्ट करीत कॅप्शनमध्ये प्रियांका चोप्रा लिहिते, '... आणि त्यांनी ते करून दाखवलं.' आमच्या वडिलांच्या वाढदिवसानिमित्त मित्र आणि कुटुंबीयांच्या आशीर्वादाने आज त्यांचा हस्ताक्षर विधी आणि साखरपुड्याचा कार्यक्रम पार पडणार आहे. अशा आशयाची पोस्ट तिने भाऊ सिद्धार्थ आणि त्याची होणारी पत्नी नीलम यांचा उल्लेख करत केली. काही वर्षांपूर्वीच प्रियांका चोप्राच्या वडिलांनी या जगाचा निरोप घेतला. असे असले तरी प्रियांका आणि तिच्या संपूर्ण कुटुंबाने तिच्या वडिलांच्या आठवणी जपून ठेवल्या आहेत. प्रियांका चोप्राच्या वडिलांचा वाढदिवस २६ ऑगस्ट रोजी असतो. याच दिवसाचे औचित्य साधत सिद्धार्थ आणि नीलम यांनी आपल्या आयुष्याची नवी सुरुवात वडिलांच्या आशीर्वादाने केली आहे. साखरपुड्याच्या कार्यक्रमातील सिद्धार्थ आणि नीलम यांच्या फोटोंना सोशल मीडियावर नेटकऱ्यांनी चांगलीच पसंती दिली आहे. सिद्धार्थनेही त्याच्या इन्स्टाग्राम अकाउंटवरून साखरपुड्याचे फोटो पोस्ट केले आहेत. गुलाबी रंगाचा घागरा आणि गळ्यात नाजूक नेकलेस नीलमने परिधान केला होता. तसेच सोनेरी रंगाच्या पारंपरिक ड्रेसमधल्या सिद्धार्थच्या लुकचेही सोशल मीडियावर कौतुक होत आहे.

साखरपुड्याच्या निमित्ताने संपूर्ण चोप्रा कुटुंब एकत्र येऊन या जोडीला शुभाशीर्वाद दिले. सिद्धार्थ आणि नीलम यांच्या साखरपुड्यात प्रियांका चोप्रा खूपच सुंदर दिसत होती. प्रियांकाने नारंगी रंगाचा ड्रेस घातला होता. केसाचा अंबाडा बांधत तिने पिवळ्या रंगाचं फूल माळलं होतं. सिद्धार्थ हा प्रियांकाचा लहान भाऊ आहे. त्यामुळे साखरपुड्याच्या कार्यक्रमात या जोडीने प्रियांका चोप्राच्या पाया पडत तिचे शुभाशीर्वाद घेतले आहेत. दरम्यान, प्रियांका चोप्रा खास भावाच्या लग्न विधींसाठी भारतात आली आहे. साखरपुड्याआधी झालेल्या प्री-वेडिंग सोहळ्यात अभिनेत्रीने मजंठा रंगाची डिझायनर साडी नेसली होती. तिच्या या लूकचं सोशल मीडियावर कौतुक करण्यात आलं होतं.

# दुलीप ट्रॉफी : 3 खेळाडू संघाबाहेर

## बीसीसीआयने बदलला दुलीप ट्रॉफीचा फॉरमॅट

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**दुलीप ट्रॉफी २०२४ चे सामने येत्या ५ सप्टेंबरपासून सुरू होत आहे. यावेळी या स्पर्धेत एकूण चार संघ सहभागी होणार आहेत. चारही संघ बीसीसीआयने आधीच जाहीर केले होते. बीसीसीआयने दुलीप ट्रॉफीचा फॉरमॅट बदलला आहे. याआधी ही देशांतर्गत स्पर्धा झोनल फॉरमॅटमध्ये खेळवली जात होती, मात्र आता यामध्ये चार संघ सहभागी होणार आहेत. ज्यात भारत अ, भारत ब, भारत क आणि भारत ड असे ४ चार संघ असतील.**



पण आता दुलीप ट्रॉफी सुरू होण्यापूर्वीच मोठे बदल झाले आहेत. भारताचे तीन खेळाडू स्पर्धेबाहेर झाले आहेत. भारतीय संघाचे वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराज आणि उमरान मलिक यांना सप्टेंबरमध्ये होणाऱ्या दुलीप ट्रॉफीच्या पहिल्या फेरीसाठी संघातून रिलीज करण्यात आले आहे. भारतीय क्रिकेट बोर्डाने मंगळवारी (२७ ऑगस्ट) सांगितले की, सिराज आणि उमरान दोघेही आजारपणामुळे बाहेर पडले आहेत. त्यांच्या जागी वेगवान गोलंदाज नवदीप सैनी आणि पुद्दुचेरीचा वेगवान गोलंदाज गौरव यादव यांचा समावेश करण्यात आला आहे. गौरव यादवने मध्य प्रदेशचे प्रतिनिधित्वही केले आहे. गेल्या रणजी ट्रॉफी मोसमात तो सर्वाधिक विकेट घेणारा वेगवान गोलंदाज होता. दरम्यान, फिरकी अष्टपैलू रवींद्र जडेजालाही रिलीज करण्यात आले आहे. सिराज टीम बी चा भाग होता. उमरान टीम सी चा भाग होता. तर जडेजा टीम बी चा भाग होता.बीसीसीआयने आपल्या निवेदनात म्हटले आहे की, सिराज आणि मलिक दोघेही आजारी आहेत आणि दुलीप ट्रॉफी सामन्यांसाठी वेळेत तंदुरुस्त होण्याची अपेक्षा नसल्याने त्यांना रिलीज केले. ही स्पर्धा ५ सप्टेंबर 2024 पासून आंध्र प्रदेशातील अनंतपूर आणि बेंगळुरू येथील एम चिन्नास्वामी स्टेडियम येथे सुरू होईल. इंडिया अ संघाचा कर्णधार शुभमन गिल, इंडिया ब संघाचा कर्णधार अभिमन्यू इसवरन, इंडिया क संघाचा कर्णधार ऋतुराज गायकवाड आणि इंडिया डी संघाचा कर्णधार श्रेयस अय्यर असेल.

### दुलीप ट्रॉफीचे पूर्ण वेळापत्रक

- ५-८ सप्टेंबर २०२४: भारत अ विरुद्ध भारत ब – बेंगळुरू
- ५-८ सप्टेंबर २०२४: भारत क विरुद्ध भारत ड –अनंतपूर
- १२-१५ सप्टेंबर २०२४: भारत अ विरुद्ध इंडिया डी – अनंतपूर
- १२-१५ सप्टेंबर २०२४: भारत ब विरुद्ध भारत क - अनंतपूर
- १९-२२ सप्टेंबर २०२४: भारत अ विरुद्ध भारत क – अनंतपूर
- १९-२२ सप्टेंबर २०२४: भारत ब विरुद्ध भारत ड – अनंतपूर.

# भारतीय क्रिकेटपटूंवर पैशांचा पाऊस

## रणजी करंडक विजेत्याला 5 कोटी रुपयांचे बक्षीस

। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (BCCI) देशांतर्गत स्तरावरील सर्व महिला आणि कनिष्ठ क्रिकेट स्पर्धांमध्ये 'प्लेअर ऑफ द मॅच' आणि 'प्लेअर ऑफ द टूर्नामेंट' पुरस्कार विजेत्यांना बक्षीस रक्कम जाहीर केली आहे. सोशल मीडियावरील एका पोस्टमध्ये, बीसीसीआयचे सचिव जय शाह शाह यांनी जाहीर केले की पुरुष क्रिकेटमधील विजय हजारे आणि सय्यद मुश्ताक अली स्पर्धेतील 'प्लेअर ऑफ द मॅच'ला बक्षीस रक्कम दिली जाईल.**





### देशांतर्गत स्पर्धांच्या बक्षीस रकमेत वाढ

आम्ही देशांतर्गत क्रिकेटचा भाग असलेल्या सर्व महिला आणि ज्युनियर क्रिकेट स्पर्धांमध्ये प्लेअर ऑफ द मॅच आणि प्लेअर ऑफ द टूर्नामेंटसाठी बक्षीस रक्कम देण्यास सुरूवात करत आहोत. याशिवाय विजय हजारे आणि सय्यद मुश्ताक अली सिनियर पुरुष स्पर्धेतील सामनावीरासाठी बक्षीस रक्कम दिली जाईल. देशांतर्गत सर्किटमधील सर्वोत्कृष्ट कामगिरी ओळखणे आणि त्यांना बक्षीस देणे हे या उपक्रमाचे उद्दिष्ट आहे

जय शाह यांनी ट्विट करत माहिती दिली की, "आम्ही देशांतर्गत क्रिकेटचा भाग असलेल्या सर्व महिला आणि ज्युनियर क्रिकेट स्पर्धांमध्ये प्लेअर ऑफ द मॅच आणि प्लेअर ऑफ द टूर्नामेंटसाठी बक्षीस रक्कम देण्यास सुरूवात करत आहोत. याशिवाय विजय हजारे आणि सय्यद मुश्ताक अली सिनियर पुरुष स्पर्धेतील सामनावीरासाठी बक्षीस रक्कम दिली जाईल. देशांतर्गत सर्किटमधील सर्वोत्कृष्ट कामगिरी ओळखणे आणि त्यांना बक्षीस देणे हे या उपक्रमाचे उद्दिष्ट आहे. या प्रयत्नात अटळ पाठिंबा दिल्याबद्दल सर्वोच्च परिषदेचे मनःपूर्वक आभार. आम्ही एकत्रितपणे आमच्या क्रिकेटपटूंसाठी आणखी चांगले वातावरण तयार करत आहोत. जय हिंद."गेल्या वर्षी बीसीसीआयने देशांतर्गत स्पर्धांच्या बक्षीस रकमेत वाढ केली होती आणि रणजी करंडक विजेत्याला ५ कोटी रुपयांचे रोख बक्षीस देण्यात आले होते. इराणी चषकाचे रोख बक्षीसही दुप्पट करण्यात आले असून विजेत्यांना २५ लाखांऐवजी ५० लाख रुपये आणि उपविजेत्याला २५ लाख रुपये देण्यात आले होते. दुलीप ट्रॉफीमध्ये, विजेत्यांना आता १ कोटी रुपये आणि उपविजेत्याला ५० लाख रुपये मिळतील, तर विजय हजारे ट्रॉफीच्या विजेत्याला १ कोटी रुपये आणि दुसऱ्या स्थानावर असलेल्या संघाला ५० लाख रुपये मिळतील. टी-२० विश्वचषक २०२४ च्या अंतिम सामन्यात भारतीय संघाने दक्षिण आफ्रिकेचा ७ धावांनी पराभव करून विजेतेपद पटकावले.



# माजी फुटबॉल प्रशिक्षक एरिक्सन यांचे निधन

। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज



इंग्लंड फुटबॉल संघाचे पहिले परदेशी प्रशिक्षक, तसेच इटली, पोर्तुगाल आणि स्वीडनमध्ये क्लब संघांना मार्गदर्शन करताना यशस्वी कामगिरी करणारे स्वेन-गोरान एरिक्सन यांचे सोमवारी निधन झाले. ते ७६ वर्षांचे होते. एरिक्सन यांनी आठ महिन्यांपूर्वी आपल्याला स्वादुपिंडाचा कर्करोग झाल्याचे सांगितले होते. तसेच आपण वर्षभराहून अधिक काळ जगू शकणार नसल्याचेही ते म्हणाले होते. त्यानंतर त्यांच्या सर्वांत आवडत्या लिव्हरपूल क्लबने त्यांना एका विशेष सामन्यात प्रशिक्षकपद भूषवण्याची संधी दिली होती. मायदेशात (स्वीडन) 'स्वेनीस' या नावाने प्रचलित असलेल्या एरिक्सन यांना वयाच्या २७व्या वर्षीच फुटबॉल खेळण्यातून निवृत्ती घ्यावी लागली होती. मात्र, त्यानंतर प्रशिक्षक म्हणून त्यांनी यशस्वी कारकीर्द घडवली. २००१ मध्ये त्यांची इंग्लंडच्या राष्ट्रीय फुटबॉल संघाचे प्रशिक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्यांना इंग्लंडची 'सुवर्ण पिढी' मानल्या जाणाऱ्या डेव्हिड बेकहॅम, वेन रूनी, फ्रँक लॅम्पार्ड, स्टीव्हन जेरार्ड यांसारख्या नामांकित खेळाडूंना मार्गदर्शन करण्याची संधी लाभली.एरिक्सन यांच्या मार्गदर्शनाखालील इंग्लंडला २००२ आणि २००६ च्या विश्वचषकात उपांत्यपूर्व फेरी गाठण्यात यश आले होते. मात्र, त्यांना अनुक्रमे ब्राझील आणि पोर्तुगालकडून पराभव पत्करावा लागला होता. तसेच २००६ च्या युरो अजिंक्यपद स्पर्धेतही इंग्लंडने उपांत्यपूर्व फेरी गाठली होती, पण इथेही पोर्तुगालचे आव्हान त्यांना परतवता आले नाही. फुटबॉलच्या मैदानाइतकेच मैदानाबाहेरही एरिक्सन चर्चेत राहिले. त्यांचे स्वीडनमधील अभिनेत्री आणि मॉडेल उलरिका जॉन्सन, तसेच फुटबॉल संघटनेच्या माजी सचिव फारिया आलम यांच्याशी प्रेमसंबंध होते. त्यामुळे इंग्लंडमधील वृत्तपत्रांमध्ये त्यांच्याविषयी चर्चा असायची. "माझे वैयक्तिक आयुष्य फारसे वैयक्तिक राहिलेले नाही," असे एरिक्सन २०१८ मध्ये म्हणाले होते.